Majalgaon Parisar

RNI No. 71499


# माजलगाव परिसर

आपला परिसर आपली बातमी

*निवासी संपादक — नंदकुमार हावरगावकर* *उपसंपादक— रविंद्र सोनवळकर* *वृत्त संपादक— भारत घनघाव*

बीड/गुरुवार दि. २३ जुलै २०२६ वर्ष ४० अंक २२ पाने ४ किंमत रु.२.००/—

# माहूरच्या श्री रेणुका मातेच्या 'तांबूल' या प्रसादाला प्रतिष्ठेचा जीआय टॅग!




माहूर :— तीर्थक्षेत्र माहूर गडावरील रेणुका माता तांबूल प्रसादाला केंद्र सरकारकडून अधिकृत जीआय टॅग प्राप्त झाला आहे तिरुपती लाडू नंतर जीआय मानांकन मिळवणारा हा देशातील दुसरा मंदिर प्रसाद ठरला आहे या सन्मानामुळे माहूरच्या धार्मिक सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळणार आहे.

रेणुका माता प्रसाद तांबूल श्री रेणुका माता मंदिर माहूर येथे दर्शनानंतर भाविकांना शतकोंशतके दिला जाणारा पारंपारिक प्रसाद म्हणजे तांबूल!

भौगोलिक मानांकन जीआय टॅग म्हणजे विशिष्ट भौगोलिक क्षेत्राशी निगडित अद्वितीय गुणधर्म परंपरा आणि वैशिष्ट्य असलेल्या उत्पादनाला मिळणारे कायदेशीर संरक्षण तांबुलाचे वैशिष्ट्य या तांबूलामध्ये १४ नैसर्गिक घटकांचा समावेश आहे.

नागवेलीची पाने कात चुना सुपारी बडीशेप लवंग वेलची जायफळ जायपत्री ओवा, धनादाळ असमानतारा ज्येष्ठमध इत्यादी मिळून तो तयार केला जातो परंपरा व मानांकनास सखोल अभ्यास ऐतिहासिक पुरावे आणि परंपरेचे दस्तावेज सादर केल्यानंतर रेणुका माता प्रसाद तांबूल या प्रसादाला प्रतिष्ठेचा टॅग प्राप्त झाला आहे.

तंबुलाच्या परंपरेला कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. स्थानिक सारागीर आणि शेवे करायला प्रोत्साहन धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण झाली आहे. यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे.

हा टॅग प्राप्त करण्यासाठी यामध्ये श्री समीर भोपी श्री चंद्रकांत भोपी गावंडे अभिषेक परळकर लवकुश जाधव यांचे सहकार्य व योगदान लाभले आहे. यासाठी तांत्रिक मार्गदर्शन प्राध्यापक डॉक्टर गणेश हिंगमिरे यांनी केले. महाराष्ट्रातील पहिला मानांकन प्रसाद म्हणून माहूरच्या रेणुका माता प्रसाद तांबुलाने इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल, ही मान्यता आपल्या परंपरेचा अभिमान आहे.

## पोहनेर चा ओंकार प्रदीप देशपांडे लोकसेवा आयोग परिक्षेत राज्यात तिसरा



बीड ( मधुसूदन सोनवळकर ):— महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत झालेल्या २०२६ च्या औषध प्रशासन निरीक्षक ( ड्रग इंस्पेक्टर)गट ब राजपत्रित परिक्षेत राज्यात खुल्या प्रवर्गातून तिसऱ्या स्थानावर असून एकत्रीत गुणवत्ता यादीत राज्यात दहावा आला आहे

ओंकार हा मूळचा पोहनेर ता . परळी येथील रहिवाशी असून त्याने भारत सरकारच्या नायपर मोहाली (पंजाब) या राष्ट्रीय औषध निर्मान शास्त्र संस्थेतून एम . फार्म ( गोल्ड मेडल ) ऊच्च शिक्षण यश संपादीत केले आहे

त्याच्या यशा बाबत वडील प्रदीप देशपांडे श काका आनंद देशपांडे , अरुण देशपांडे सह सर्व स्नेही मित्र परीवार व गावकर्‍यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे

## शासनाच्या २७ सेवा एकाच छताखाली

मुंबई, दि. २२— लोकाभिमुख सरकार आणि जनताकेंद्रित व्यवस्था कशी असावी, याचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिला. रयतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या त्यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन शासनाने या अभियानाला श्छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानश हे नाव दिले असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर चालण्याचा महाराष्ट्र शासनाचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे सांस्कृतिक कार्य, माहिती व तंत्रज्ञान मंत्री अँड आशिष शेलार यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात श्छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानश आयोजित करण्यात आले आहे. माहीम विधानसभा मतदारसंघातील अभियानाचा शुभारंभ प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे झाला. या अभियानासा खुप चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे मंत्री अशिष शेलार यांनी सांगितले.

# नागरी व मल्टीस्टेट पतसंस्थांच्या सुरक्षिततेसाठी कायद्यात सुधारणा करणार — मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई— राज्यातील नागरी सहकारी आणि मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक, सक्षम व सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. महाराष्ट्रातील नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या भेटीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा (काका) कोयटे, राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, मल्टीस्टेट फेडरेशनचे संचालक घ्ड.रविंद्र कानडे, शिवाजीराव कपाळे, कडूभाऊ काळे, जितेंद्र जैन, एस.एस. गडगे आदी उपस्थित होते.

बैठकीत पतसंस्थांसमोरील अडचणी, विद्यमान कायद्यांतील त्रुटी, ठेवीदार व सभासदांच्या हिताचे संरक्षण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य शासन सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध आवश्यक असल्याचे सांगत आवश्यक कायदे बदल करण्याचे आश्वासन दिले.

या संपूर्ण प्रक्रियामध्ये मराठवाड्याच्या वतीने माजलगाव येथील नावलौकिक असलेली श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे कार्यकारी संचालक अँड.रवींद्र कानडे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

दरम्यान, दिल्ली येथे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनाही मल्टीस्टेट पतसंस्थांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या बैठकीस सुरेश वाबळे, प्रवीण दरेकर, संजय भेंडे, काका कोयटे, कडूभाऊ काळे, शिवाजीराव कपाळे, जितेंद्र जैन, रवींद्र कानडे, सुकुमार पाटील, एस. एस. गडगे, एम. एल. चौगुले व शिवाजीराव ढोले आदी उपस्थित होते. शहा यांच्यासमवेत स्वतंत्र बैठक घेत केंद्रीय सहकार मंत्री अमित घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांच्या घोषणेमुळे राज्यातील नागरी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, अधिक सुरक्षित, व्यवस्थेकडे वाटचाल होईल, सक्षम व पारदर्शक सहकार असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला.

Regd.No.MGN/RSR/CR/1072 Date 28/12/2000

## श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगाव

कार्यालय :– जुना मोंढा माजलगाव जिल्हा बीड

### २६ वी वार्षिक सभेची सूचना (नोटीस)
### (फक्त सभासदांसाठी)

दि. २२/०७/२०२६

श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगाव चे सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०८/२०२६ वार रविवार या दिवशी दुपारी ठीक १.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात संस्थेच्या अध्यक्षा कानडे जयदेवी रामेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे तरी आपण सगळेच वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती

**विषय सूची:–**

विषय क्रमांक १.:– मागील दिनांक २४/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांचे वाचन करून त्यास कायम करणे बाबत

विषय क्रमांक २ :– ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व तेरिज पत्रक अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे

विषय क्रमांक ३. सन ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय कमांक ४. :– सन २०२५–२०२६ चे लेखापरिक्षण अहवाल वाचुन त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक ५:– दि ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ च्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ६:– सन २०२६–२०२७ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ७ :– सन २०२६–२७ या वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

विषय क्रमांक ८:– महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार परतफेड योजनेअंतर्गत सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्याची माहिती देणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे बाबत

विषय क्रमांक ९:– संस्थेच्या नफा वाटणीस मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक १०:– कर्मचा–यांच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ११:– सामोपचार कर्ज परतफेड योजनेस मंजुरी देणे व नोंद घेणे

विषय क्रमांक १२:– कर्ज वाटपाचे संबंधित धोरणात्मक नियमावली व ठेवून नियमावली ठरविणे व धोरणात्मक निर्णय घेणे बाबत

विषय क्रमांक १३ :– संस्थेच्या ठेवी व गुंतवणुकीस मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक १४ :–सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात थकीत कर्ज खात्यात सूट दिलेल्या रकमेस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १५:– संस्थेच्या सभासदाकरीता एक रक्कमी परतफेड योजना राबविणे व कर्ज वसुली बाबत धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.

विषय क्रमांक १६:–श्री मंगलनाथ नागरी सहकारी पत संस्थेचे विलीनीकरण amalgamation श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को. ऑप.केडिट सो. लि. या बहुराज्यीय संस्थेत करणे बाबत.

विषय क्रमांक १७:– संस्थकरीता आदर्श उपविधी लागु करणे बाबत.

विषय क्रमांक १८:– माननीय अध्यक्षा साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे बाबत

स्थळ:– मुख्य कार्यालय माजलगाव<br>
दिनांक:– ०९/०८/२०२६<br>
वेळ :– दुपारी ठीक १.०० वाजता

माननीय संचालक मंडळाच्या आदेशावरून<br>
(व्यवस्थापक)<br>
श्री मंगलनाथ नागरी सहकारी पतसंस्था<br>
मर्यादित माजलगाव

**टीप** :–१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

२. ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयात सात दिवस आगोदर मिळतील असे पाठवावेत.

प्रतिलिपी:–

१. मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय माजलगाव.

२. मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कार्यालय बीड.

३. संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे.

Regd.No.MGN/RSR/CR/1089/2014

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ॲग्रो को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड माजलगाव

कार्यालय :– जुना मोंढा माजलगाव जिल्हा बीड

### १३ वी वार्षिक सभेची सूचना (नोटीस)
### (फक्त सभासदांसाठी)

दि. २२ /०७/२०२६

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ॲग्रो को ऑप. सोसायटी लि. माजलगाव (महाराष्ट्र व कर्नाटक) चे सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०८/ २०२६ वार रविवार या दिवशी दुपारी ठीक ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात संस्थेच्या अध्यक्ष रोहिणकर नारायण परसराम यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे तरी आपण सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती

**विषय सूची:–**

विषय क्रमांक १.:– मागील दिनांक २४/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांचे वाचन करून त्यास कायम करणे बाबत

विषय क्रमांक २ :– ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व तेरिज पत्रक अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे

विषय क्रमांक ३. :– सन ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय कमांक ४. :– सन २०२५–२०२६ चे लेखापरिक्षण अहवाल वाचुन त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक ५:– दि ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ च्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ६:– सन २०२६–२०२७ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ७ :– संस्थेच्या नफा वाटणीस मान्यता देणे.

विषय क्रमांक ८:–सन २०२६–२७ या वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

विषय क्रमांक ९:– पोट नियम दुरुस्ती बाबत विचार विनीमय करणे व मान्यता देणे बाबत.

विषय कमांक १०:– खते बी बीणणे व कृषि साहित्य विकी आउटलेट दुकाने सुरु करण्या बाबत.

विषय क्रमांक ११:– संस्थेच्या व्यवसाय वाढीच्या दृष्टीकोनातून वेअरहाउस, कोल्डस्टोअरेज, सारखे शेती पुरक प्रकल्प उभारणे करीता मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १२:– एन.सी.डी.सी. नाबार्ड यांचेकडून भागभांडवल उभारणे करीता कर्ज घेणे करीता प्रस्ताव पाठविणे बाबत.

विषय क्रमांक १३:– मल्टीस्टेट को ऑप सोसायटीज ॲक्ट/नियम २००२ च दुरुस्त कायदा २०२३ नुसार तसेच मा. केंद्रिय निबंधक सहकार नवी दिल्ली यांचे कडील दि. १६/१०/२०२३ नुसार आदर्श उपविधी तसेच इतर आवश्यक दुरुस्त्या संस्थेच्या पोटनियमात करणे बाबत विचार करणे.

विषय क्रमांक १४:–माननीय अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे बाबत

माननीय संचालक मंडळाच्या आदेशावरून<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ॲग्रो को–ऑपरेटिव्ह<br>
सोसायटी लिमिटेड माजलगाव<br>
(महाराष्ट्र व कर्नाटक)

स्थळ:– संस्थेच्या मुख्य कार्यालयात<br>
दिनांक:– ०९/०८/२०२६<br>
वेळ :– दुपारी ठीक ३.०० वाजता

**टीप** :–१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

२. ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयात सात दिवस आगोदर मिळतील असे पाठवावेत.

प्रतिलिपी,

१. केंद्रिय निबंधक कार्यालय, न्यु दिल्ली.

२. संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली.

३. संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळावर (Website) www.shrimangalnath.com वर उपलब्ध आहे.

Regd.No.MSCS/CR/404 Date 04/04/2011

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव

कार्यालय :– जुना मोंढा माजलगाव जिल्हा बीड

## १५ वी वार्षिक सभेची सूचना (नोटीस)

**(फक्त सभासदांसाठी)**

दि. २२ /०७/२०२६

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड माजलगाव चे सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०८/ २०२६ वार रविवार या दिवशी सकाळी ठीक ११.०० वाजता संस्थेचे मुख्य कार्यालय माजलगाव येथे संस्थेच्या अध्यक्षा कानडे जयदेवी रामेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे तरी आपण वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे. ही नम्र विनंती

### विषय सूची:–

विषय क्रमांक १.:– मागील दिनांक २४/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांचे वाचन करून त्यास कायम करणे बाबत

विषय क्रमांक २ :– ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या ताळेबंद नफा तोटा पत्रक व तेरिज पत्रक अहवालाचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे

विषय क्रमांक ३. सन ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेरच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय कमांक ४. :– सन २०२५–२०२६ चे लेखापरिक्षण अहवाल वाचुन त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक ५:– दि ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ च्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ६:– सन २०२६–२०२७ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे बाबत

विषय क्रमांक ७ :– सन २०२६–२७ या वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

विषय क्रमांक ८:– इमारत निधी व इतर निधीच्या उपभोक्तेवर विचार विनीमय करणे बाबत.

विषय क्रमांक ९ :– दीर्घ मुदतीच्या भविष्यातील योजना व वार्षिक कृती आराखड्याच्या योजनेवर विचार विनिमय करणे बाबत

विषय क्रमांक १०:– संस्थेच्या नफा वाटणीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक ११:– कर्मचारी व पिग्मी एजंट यांच्या नियुक्ती मान्यता देणे व त्यांना देण्यात आलेल्या जबाबदारीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १२:– जे कर्जदार संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक आहेत त्यांच्या यादीवर चर्चा करुन मल्टीस्टेट अॅक्ट नुसार त्यांच्या कर्जाबाबत माहिती घेणे व त्यास मान्यता देणे.

विषय क्रमांक १३:– २०२५–२०२६ या कालावधीमध्ये व वार्षिक सभेपुर्वी झालेल्या संस्थेच्या सर्व सभासदांना मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १४:– कर्ज वाटप व सोने तारण कर्ज वाटप या व्यवहाराबाबत विचार विनीमय करणे व त्या व्यवहारास मान्यता देणे.

विषय क्रमांक १५:– कर्ज वाटप व्यवहाराशिवाय व्यवसायीक दृष्टीकोनातुन प्रकल्प उभा करणे, शेती पुरक प्रकल्प उदा. वेअर हावुस, कोल्ड स्टोअरेज प्रकल्प करीता जमिन खरेदी करणे व प्रकल्प उभारणे बाबत.

विषय क्रमांक १६:– सामोपचार कर्ज परतफेड योजनेस मंजुरी देणे व नोंद घेणे.

विषय क्रमांक १७:– कर्ज वाटपाचे संबंधित धोरणात्मक नियमावली व ठेव नियमावली ठरविणे व धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.

विषय क्रमांक १८:– संस्थेच्या ठेव गुंतवणुकीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक १९:– सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात थकीत कर्ज खात्यास सुट दिलेल्या रक्कमेस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक २०:– संस्थेच्या सभासदाकरिता एक रक्कमी परतफेड योजना राबविणे व कर्ज वसुली बाबत धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.

विषय क. २१. संस्थेच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता बदलणे बाबत. व मुख्य कार्यालयाचे स्थलांतर छत्रपती संभाजीनगर येथे करणे बाबत.

विषय क्रमांक २२:– श्री मंगलनाथ नागरी सहकारी पत संस्थेचे श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को. ऑप.क्रेडिट सो. लि. या संस्थेत विलीनीकरण amalgamation करणे करीता मंजुरी देणे बाबत.

विषय क्रमांक २३:– संस्थेच्या व्यवसाय वाढीच्या दृष्टीकोनातून शाखांचा विस्तार करणे करिता नविन शाखा ओपनिंगचा प्रस्ताव, कार्यक्षेत्र वाढीचा प्रस्ताव मा. सेंटल रजिस्टार या कार्यालयात सादर करणे बाबत.

विषय क्रमांक २४:– संस्थेच्या सभासदांना कर्ज वाटण्यासाठी तरलता उभारणेकरीता एन.सी.डी.सी. या वित्तीय संस्थेकडून ५० कोटी कर्ज मंजुर झाल्याबाबत कर्ज घेणे करीता मान्यता देणे. व कागदपत्रे पुर्तते संदर्भात
अधिकार देणे बाबत.

विषय क्रमांक २५:– संस्थेच्या व्यवसायाकरीता खरेदी व लिजवर घेण्यात आलेल्या जागेच्या व्यवहारास मान्यता देणे व सदरील जागा एन.सी.डी.सी. या संस्थेस तारण देणे बाबत.

विषय क्रमांक २६:– संस्थेच्या उपविधीत दुरुस्ती करणे बाबत.

विषय क्रमांक २७:– मंगलनाथ मल्टीस्टेट अॅग्रो को ऑप. सो. लि. ही संस्था उपकंपनी (Subsidiary) म्हणून घेणे संदर्भात मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक २८:–संस्थेच्या थकीत कर्ज खात्यावर करण्यात आलेल्या लवाद प्रकीयेतून प्राप्त झालेल्या लवाद निवाडा कर्ज खाते पुढील कारवाई करीता विक्री अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठवून कर्ज खाते सोपवणे बाबत.

विषय क्रमांक २९:– सन २०२६–२७ वर्षाकरिता लवाद निवाडा
अधिकारी (Arbitrator)च्या नियुक्तीस मान्यता देणे.

विषय क्रमांक ३०:– थकीत कर्जदार सभासद यांच्यावर लवाद/न्यायालयीन/१३८ ची कारवाई करणे संदर्भात अधिका–यांच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक ३१:– संस्थेच्या छ. संभाजीनगर कॉर्पोरेट कार्यालय व शाखेकरीता खरेदी करण्यात ओल्या फर्निचर, लॉकर, व इतर खर्चास मान्यता देणे बाबत.

विषय क्रमांक ३२:– माननीय अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे बाबत.

**स्थळ:– मुख्य कार्यालय, माजलगाव**
**जि.बीड**
**दिनांक:– ०९/०८/२०२६**
**वेळ :– सकाळी ठीक ११.०० वाजता**

माननीय संचालक मंडळाच्या आदेशावरून
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह**
**क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव**
(महाराष्ट्र व कर्नाटक)

टीप :–

१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभेचे कामकाज त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल या सभेस गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही.

२. ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयात सात दिवस आगोदर मिळतील असे पाठवावेत.

प्रतिलिपी,

१. केंद्रिय निबंधक कार्यालय, न्यु दिल्ली.

२. संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली.

३. संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळावर (Website) www.shrimangalnath.com वर उपलब्ध आहे.

# जातीवरून ठरणार का कोण गरीब कोण श्रीमंत?

कुलकर्णी काय गरीब असतात का?

हा प्रश्न कानावर पडला आणि काही क्षणांसाठी मी नि:शब्द झालो. प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीच्या मनात कदाचित कोणताही वाईट हेतू नसावा. तो सहज बोलून गेला असेल. पण त्याच्या त्या एका वाक्याने माझ्या मनात अनेक प्रश्नांचे वादळ उठले. आपण आजही माणसाची आर्थिक परिस्थिती त्याच्या आडनावावरून, जातीवरून किंवा समाजावरून ठरवतो का? गरीबी आणि श्रीमंतीचा संबंध खरोखरच जातीशी आहे का?

मी आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड काढण्यासाठी गेलो होतो. भारत सरकारची ही अत्यंत महत्त्वाची आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त योजना आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा उपलब्ध करून दिला जातो. गंभीर आजारांवरील उपचार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयातील खर्चाची मोठी जबाबदारी ही योजना उचलते. आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांसाठी ही योजना एखाद्या संजीवनीपेक्षा कमी नाही. शासनाच्या अनेक चांगल्या योजनांपैकी ही एक उल्लेखनीय योजना आहे.

माझे नाव विचारले गेले. मी शांतपणे उत्तर दिले, ष्प्रदीप कुलकर्णी.ष त्यावर समोरच्या व्यक्तीने सहजच प्रतिक्रिया दिली, ष्कुलकर्णी काय गरीब असतात का?ष

या एका वाक्याने माझ्या मनात अनेक विचार सुरू झाले. कुलकर्णी, देशपांडे, जोशी किंवा इतर काही आडनावे आली की आपल्यासमोर आर्थिकदृष्ट्या सक्षम, सुस्थितीतले कुटुंब उभे राहते. तर काही विशिष्ट समाजातील व्यक्ती म्हणजे गरिबीचे प्रतीक, असा एक समज समाजाच्या मनात तयार झाला आहे. हा समज कितपत खरा आहे?

कदाचित इतिहासात काही समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील. काही समाजांना शिक्षणाच्या आणि नोकरीच्या अधिक संधी मिळाल्या असतील. परंतु इतिहास आणि वर्तमान यामध्ये मोठा फरक आहे. काळ बदलला, परिस्थिती बदलली, व्यवसाय बदलले, उत्पन्नाची साधने बदलली आणि जीवनशैलीही बदलली. आज अनेक तथाकथित सवर्ण कुटुंबे अत्यंत कठीण परिस्थितीत जीवन जगत आहेत. त्याचप्रमाणे अनेक मागास समजल्या जाणाऱ्या समाजातील कुटुंबे आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम झाली आहेत. त्यामुळे केवळ जातीच्या आधारावर कोण श्रीमंत आणि कोण गरीब आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे.

गरीबीला जात नसते. ती परिस्थितीमुळे येते. एखाद्या शेतकऱ्याचे पीक वारंवार नष्ट झाले, एखाद्याचा व्यवसाय बंद पडला, एखाद्या कुटुंबावर आजारपणाचा मोठा खर्च झाला किंवा कमावणारी व्यक्ती अचानक गेली, तर त्या कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटते. या संकटांना कोणतीही जात अडवत नाही. ती कोणत्याही समाजावर कोसळू शकतात.

आपल्या समाजात मात्र अजूनही आडनाव पाहून माणसाचे मूल्यमापन करण्याची सवय आहे. ष्हे अमुक समाजाचे आहेत म्हणजे श्रीमंतच असतीलष, ष्हे तमुक समाजाचे आहेत म्हणजे गरिबच असतीलष, असे ठोकताळे आजही अनेकांच्या मनात आहेत. हे ठोकताळे अनेक वेळा वास्तवापासून खूप दूर असतात.

शासनाच्या अनेक योजना आर्थिक निकषांवर आधारित आहेत, हे स्वागतार्ह आहे. परंतु अजूनही काही योजना अशा आहेत की त्यामध्ये जात हा प्रमुख निकष मानला जातो. सामाजिक न्यायाची गरज नाकारता येणार नाही. ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी काही विशेष उपाय आवश्यक असतात. परंतु आर्थिक मदतीच्या योजनांमध्ये लाभार्थ्यांची प्रत्यक्ष आर्थिक स्थिती हा देखील अत्यंत महत्त्वाचा निकष असायला हवा. कारण उपासमार, बेरोजगारी, आजारपण किंवा आर्थिक अडचण या कोणत्याही जातीचा विचार करून येत नाहीत.

आज अनेक कुटुंबे अशी आहेत की त्यांच्याकडे नावापुरती जमीन आहे, पण उत्पन्न नाही. शिक्षण आहे, पण नोकरी नाही. घर आहे, पण घर चालवण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत. अशा कुटुंबांना केवळ त्यांच्या आडनावामुळे सक्षम समजले जाते आणि अनेक योजनांपासून ते वंचित राहतात. दुसरीकडे काही आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींना केवळ विशिष्ट वर्गात जन्म झाल्यामुळे विविध योजनांचा लाभ मिळतो. त्यामुळे गरजू व्यक्ती मागे पडते आणि गरज नसलेली व्यक्ती लाभ घेते, अशी विसंगती निर्माण होऊ शकते.

समाजानेही आपली विचारसरणी बदलण्याची गरज आहे. माणसाचा सन्मान त्याच्या जातीवरून, धर्मावरून किंवा आडनावावरून नव्हे, तर त्याच्या व्यक्तिमत्त्वावर आणि परिस्थितीवरून केला पाहिजे. कोणाचीही आर्थिक अवस्था त्याच्या नावावरून ओळखता येत नाही. अनेकजण स्वाभिमानाने जगतात, आपल्या अडचणी जगासमोर मांडत नाहीत. त्यामुळे बाहेरून दिसणारे चित्र आणि वास्तव यात मोठी दरी असू शकते.

आयुष्यमान भारतसारख्या योजना म्हणजे गरजू नागरिकांसाठी मोठा आधार आहेत. अशा योजनांचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचणे ही शासन आणि समाज या दोघांचीही जबाबदारी आहे. कोणालाही अर्ज करताना किंवा माहिती विचारताना त्याच्या जातीच्या आधारे टोमणे मारले जाऊ नयेत. शासनाच्या कार्यालयात किंवा सेवा केंद्रावर आलेला प्रत्येक नागरिक हा सन्मानाने वागवला गेला पाहिजे. कारण तो मदत मागण्यासाठी नव्हे, तर शासनाने दिलेल्या आपल्या हक्काच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी आलेला असतो.

त्या व्यक्तीने सहज विचारलेला प्रश्न माझ्या मनात मात्र एक मोठा सामाजिक प्रश्न निर्माण करून गेलाकृष्गरीब कोण?ष उत्तर एकच आहे. गरीब तो, ज्याच्याकडे पुरेशी आर्थिक साधने नाहीत. त्याची जात, धर्म, आडनाव किंवा समाज काहीही असो. गरिबीचा रंग एकच असतो आणि तिची वेदनाही सारखीच असते.

आज आवश्यकता आहे ती समाजाने आणि शासनाने दोघांनीही नवीन दृष्टीकोन स्वीकारण्याची. सामाजिक न्यायाबरोबर आर्थिक न्यायालाही तितकेच महत्त्व दिले गेले पाहिजे. योजनांचा लाभ देताना लाभार्थ्यांची खरी आर्थिक परिस्थिती, उत्पन्न, कुटुंबाची जबाबदारी आणि जीवनमान यांचा वस्तुनिष्ठ विचार झाला, तर अनेक खऱ्या गरजूंपर्यंत शासनाची मदत पोहोचू शकेल.

त्या दिवशी मला मिळालेले आयुष्यमान भारत कार्ड कदाचित माझ्यासाठी एक सरकारी कागद होता; पण त्यापेक्षा मोठी गोष्ट मला मिळाली ती म्हणजे विचार करण्यास भाग पाडणारा एक प्रश्न. आणि त्या प्रश्नाचे उत्तर आजही तेच आहेकृगरीबीला जात नसते, श्रीमंतीलाही जात नसते. माणसाची खरी ओळख त्याच्या आडनावाने नव्हे, तर त्याच्या परिस्थितीने आणि कर्तृत्वाने ठरत असते. समाजाने हा साधा पण अत्यंत महत्त्वाचा सत्य स्वीकारला, तरच खरी सामाजिक समता आणि न्यायाची सुरुवात होईल.

**—प्रदीप कुलकर्णी**

# सायन येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास उत्स्फूर्त

मुंबई, दि. २२– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस आणि दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून सायन येथील समाज मंदिर हॉलमध्ये ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान झाले. या शिबिरात शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. रक्तदान व मोफत वैद्यकीय तपासणी शिबिरांचेही आयोजन यावेळी करण्यात आले.

यावेळी आमदार कॅप्टन आर. तमील सेल्वन, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, अप्पर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात, निवासी जिल्हाधिकारी शिवनंदा लंगडापुरे उपस्थित होते.

सायन कोळीवाडा हा गरीब घटकांचा मतदारसंघ असून येथे समाधान शिबिर आयोजित केल्याबद्दल आमदार कॅप्टन आर. तमील सेल्वन यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले. प्रास्ताविकात जिल्हाधिकारी गोयल यांनी ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र समाधान शिबिर’ हा उपक्रम लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. हक्कांबरोबरच नागरिकांनी आपली कर्तव्येही पार पाडली पाहिजेत, असे सांगत त्यांनी रक्तदान शिबिरात सहभागी होऊन पावसाळ्यात रक्तपेढ्यांतील तुटवडा कमी करण्याचे आवाहन केले. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी गोयल यांनी यावेळी केले.



श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड. रविंद्र कानडे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतांना किरण काठवटे

हे पत्रक साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक **सौ. आनंदी प्रदीपराव कुलकर्णी** यांनी क्षितिज प्रिंटिंग होम चिंचगव्हाण ता. माजलगाव जि.बीड येथे छापुन सा. माजलगाव परिसर कार्यालय , परिसर भवन चिंचगव्हाण ता. माजलगाव जि.बीड येथे प्रकाशित केले.

**संपादक :– सुषमा जयंत देशमुख** मो. 7020203749

**This Weekly News Paper Owner, Printer,Publisher Sow Anandi Pradiprao Kulkarni printed at Kshitij Printing home Chinchgavan Tq. Majalgaon Dist Beed and Publised at office of The Majalgaon Parisar, Parisar Bhavan Chinchgavan Majalgaon Dist Beed (Maharashtra)**

**Editor :- Sushma Jyant Deshmukh** **Email- majalgaonparisar@gmail.com**